पुणे महानगरपालिका
प्रेस नोट (प्रसिद्धीसाठी)

पुणे, दि. १० ऑगस्ट २०२६

विषय : लोकनेते अजितदादा पवार जयंतीनिमित्त स्वच्छता सप्ताहात उत्कृष्ट कामगिरीबद्दल कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आणि ५० लाख रुपयांचे बक्षीस

लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेमार्फत दि. २२ जुलै २०२६ ते २८ जुलै २०२६ या कालावधीत संपूर्ण शहरात "स्वच्छता सप्ताह मोहीम" राबविण्यात आली. सदर १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या अंतर्गत सार्वजनिक स्वच्छतेविषयक विविध उपक्रम राबविण्यात आले.

या स्वच्छता सप्ताहातील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे तृतीय संस्थेमार्फत सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले.

आज दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, शिवाजीनगर-घोलेरोड, पुणे येथे झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात मा. महापौर मंजूषा ताई नागपुरे मॅडम आणि मा. उप महापौर परशुराम वाडेकर सर, विरोधी पक्ष नेते ॲड नीलेश निकम सर यांच्या शुभहस्ते परिमंडळ क्रमांक ५ अंतर्गत कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जाहीर करण्यात आले.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल परिमंडळ क्रमांक ५ माननीय उप आयुक्त श्री माधव जगताप, कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त श्री तिमय्या जगले, वरीष्ठ आरोग्य निरीक्षक श्री राहुल राजगोळकर, आरोग्य निरीक्षक प्रमोद गायकवाड, विशाल पाटसकर , तौसिफ देशपांडे, कृष्णा अवघडे, संजय तेरेकर, संतोष गीते यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व ५० लाख रुपये बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

सार्वजनिक रस्ते, बस स्थानके, शाळा, मार्केट, कॉर्पोरेट कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालये स्वच्छता, कचरा स्पॉट निर्मूलन अशा विविध १० निकषांवर आधारित या स्पर्धेत कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाने बाजी मारली.

सदर स्वच्छता साप्ताह मध्ये मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) श्री. प्रजित नायर, मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन कार्यालय श्री. संतोष वारुळे, मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०५ श्री. माधव जगताप, मा. महापालिका सहाय्यक आयुक्त कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय श्री. तिमय्या जगले यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२२/०७/२०२६ ते दि. २८/०७/२०२६ रोजी २२, २३ आणि २४ प्रभागांमध्ये विशेष 'डीप क्लीन ड्राईव्ह' (सखोल स्वच्छता मोहीम) यशस्वीरित्या राबवण्यात आली.

(तिमय्या जगले)
महापालिका सहाय्यक आयुक्त
कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका